## रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. १७/२००९ मधील नि. ५ वरील आदेश

प्रस्तूत अर्ज वादीने आदेश ३९ नियम १ व कलम १५१ दिवाणी प्रक्रिया संहिते नुसार तात्पुरत्या मनाई हुकुमा करिता दाखल केला आहे.

०२. थोडक्यात हकीकत अशी की,

वादी/अर्जदाराने मौजे आंबवडे खुर्द, ता. पाटण, जि. सातारा येथील शेत मिळकत सर्व्हे नं. ९० याबाबत कायम मनाई हुकूम मिळणे करीता व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी सोबत करारनामा करुन दरमहा दहा हजार रुपये भाडे देण्याचा हुकूम व्हावा या करीता दाखल केला आहे. वादी/अर्जदार यांच्या म्हणण्या नुसार वाद मिळकत त्यांची व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांची वडिलार्जीत सामाईक वहिवाटीची असुन आणेवारी प्रमाणे त्यांच्या नोंदी झालेल्या आहेत, ७/१२ ला तुकाराम बाळाराम पवार या इसमाची चुकीची नोंद झालेली आहे तर मुक्ताबाई यांना सोयीसाठी दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात दाखविल्या प्रमाणे पुर्व दिशेचे क्षेत्र वहिवाटीस समाईकात दिले होते, मुक्ताबाई यांना मुलबाळ नाही त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ हे त्यांचे वारस आहेत परंतु प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी वादी मुंबईला असतो याचा गैरफायदा घेवुन मुक्ताबाईला केवळ तेच वारस आहेत अशी खोटी नोंद करुन घेतली, मुक्ताबाईच्या हिश्यात वादीचा सुध्दा हिस्सा आहे या नोंदी आधारे प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी दि. २१/९/२००७ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खरेदीपत्र करुन दिले आहे, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बिगरशेती न करता त्यांचा शेती व्यवसाय नसताना मुक्ताबाईची वहिवाटी होती त्या क्षेत्रात पवन चक्कीचे पोल उभे केले, वादीला त्याची माहिती दि. १७/१२/२००८ रोजी पहिल्यांदा झाली, चौकशी केल्यानंतर प्रतिवादींनी मालकी बाबत खात्री न करुन घेता प्रतिवादी क्र. ३ व ४ सोबत संगणमत करुन बेकायदेशीर खरेदीपत्र केले व पवन चक्कीचे टॉवर उभे केले ते काढुन मिळावेत अशी मागणी केली व दावा दाखल करुन प्रस्तुत अर्ज तात्पुरता मनाई हुकूम मिळणे करीता दाखला केला आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ याने नि.क्र. ५१ वर कैफियत व अर्जास लेखी म्हणणे दाखल करुन विरोध केला आहे. प्रतिवादी क्र. २ दाव्याचे समन्स लागुनही

हजर झाला नाही, प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी हजर होवुनही कैफियत दिली नाही. नि.क्र. ५ अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्दच मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ याच्या म्हणण्या नुसार वादीचा या मिळकतीशी काही संबंध नाही, प्रतिवादी क्र. ३ व ४ हे मुक्ताबाईचे वारस आहेत, त्यांच्या नावाचे रेकॉर्ड पाहुन, चौकशी करुन, खात्री करुन खरेदीपत्र केलेले आहे, त्यानंतर त्यांनी पवनचक्कीचे टॉवर व इतर बांधकाम केलेले आहे, त्यांची स्वतंत्र वहिवाट आहे, वादीस दावा दाखल करणेचा अधिकार नाही त्यांनी या सर्व्हे नंबर पैकी प्रतिवादीच्या हिश्याचे ८ आणे क्षेत्र विकत घेतले आहे, त्यास इतर हिस्सेदारांनी संमती दिलेली आहे, त्यानंतर सोनाबाई केळकर हिचा देखिल ६ पैशाचा हिस्सा साठेखताने घेतला आहे, त्यांची स्वतंत्र वहिवाटी आहे, कब्जा वेगळा आहे, योग्य मोबदला देवुन, सर्व परवानग्या घेवुन पवन चक्कीचे बांधकाम २००७ मध्येच पुर्ण केले आहे, त्यांच्या मध्ये पुर्वीच तोंडी वाटप झालेले आहे त्यामुळे दावा व अर्ज निरर्थक झालेला आहे म्हणुन तो खर्चासह फेटाळावा अशी विनंती केली.

०४. खालील मुददे प्रस्तुत केले व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादींनी प्रथम दर्शनी केस सिध्द केली काय? | ........ नाही |
| २. वादींच्या लाभात न्यायाचा तौलीक तराजू आहे काय? | .........नाही |
| ३. अर्ज फेटाळल्यास वादींचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे काय? | ........नाही |
| ४. काय आदेश ? | ........ अर्ज खर्चासह फेटाळण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत :—**

०५. वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द करणे करीता मिळकतीचा ७/१२ उतारा, महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र दाखल केलेले आहेत. वादी प्रतिवादी यांनी अनेक संधी देवुनही युक्तिवाद केलेला नाही त्यामुळे प्रकरण गुणवत्तेवर निकालासाठी ठेवण्यात आले. संपुर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सर्व्हे नं. ९० च्या ७/१२ उता—यामध्ये ८ लोकांची नावे मालक व कब्जेदार म्हणुन दर्शविली आहेत, वादी संपत काळु सुर्वे उर्फ संपत दादु सावंत याचे नाव या ७/१२ उता—यामध्ये नोंदविलेले नाही, दुसरा कुठलाही पुरावा वादीचे हितसंबंध या मिळकतीशी आहेत हे दर्शविण्या करीता दाखल केलेला नाही. वादीने १८ सप्टेंबर २००३ रोजीचे पत्र दाखल केले ज्यामध्ये संपत काळु सुर्वे हे नाव बदलुन संपत दादु सावंत असे झाल्याचे दिसुन येते परंतु संपत काळु सुर्वे किंवा संपत दादु सावंत असे कोणतेही नाव या ७/१२ उता—यात नाही, वादीनेच त्याच्या वादपत्रामध्ये मुक्ताबाईचा पुर्व बाजुस हिस्सा आहे असे स्पष्टपणे म्हटलेले आहे यावरुन मुक्ताबाईची स्वतंत्र वहिवाट होती ही बाब स्पष्ट होते. या मुक्ताबाईच्या वहिवाटीतील असलेल्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पवन चक्कीच्या टॉवरचे बांधकाम केले ही बाब वादीने दाव्यात मांडलेली आहे. यावरुन प्रतिवादीची त्या ठिकाणी वहिवाट आहे हे स्पष्ट होते, वादीचा या मुक्ताबाईशी काय संबंध आहे याचा कुठलाही पुरावा दाखल केलेला नाही, प्रतिवादी क्र. ३ व ४ कडुन रजिस्टर्ड खरेदीपत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केले ही बाब वादीने स्वत: दाव्यात मांडलेली आहे, प्रतिवादीची स्वतंत्र अशा मिळकतीवर कब्जे वहिवाट आहे, प्रत्येकाचे क्षेत्र वेग वेगळे आहे हे त्यांचे कथन वादीने अप्रत्यक्षरीत्या कबुल केलेले असलयामुळे वादीच्या तथाकथीत समाईकातील वहिवाटीस अडथळा करणेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. या सर्व कारणांचा विचार करुन वादीने प्रथमदर्शनी केस मांडली नाही या निष्कर्षास येवुन मुद्‌दा क्र. १ नकारार्थी उत्तरीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत :—</u>**

०६. मुद्दा क्र. १ वरील नकारार्थी निष्कर्षामुळे वादीच्या लाभात न्यायीक तौलिक तराजु नाही, त्यामुळे जर मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार नाही म्हणुन मुद्दा क्र. २ व ३ नकारार्थी उत्तरीत करुन खालील आदेश देत आहे.

## आदेश

अर्ज खर्चासह फेटाळण्यात येतो.

ठिकाण : पाटण (किरण रं. देशपांडे)
दिनांक : ०३/०४/२०१४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटण